प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com



बोरपाडळे : संजीवनी धर्मादाय उपक्रमा अंतर्गत मोफत शिबिराचे उद्घाटन प्रसंगी निवेदिता पवार व इतर मान्यवर.

## संजीवनीची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद : निवेदिता पवार

**बोरपाडळ : पुढारी वृत्तसेवा**

डॉक्टर दीपक पाटील आरोग्य व शिक्षण समूहाने आरोग्याची सेवा ची सामजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन धर्मादाय आयुक्त निवेदिता पवार यांनी केले. डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व संशोधन केंद्र बोरपाडळे यांच्या वतीने जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने 'संजीवनी धर्मादाय रुग्णालय आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत चेतना मतिमंद मुलांची शाळेतील मुलांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलताना होत्या. कांचनगंगा सुपात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरात डॉ. केदार तोडकर, डॉ. पराग कुलकर्णी यांच्या सहकार्याने उपचार करण्यात आले. या उपक्रमाची प्रशंसा केली.

My Kolhapur Edition
Apr 11, 2025 Page No. 11
Powered by: erelego.com



कोल्हापूर येथे आयोजित संजीवनी धर्मादाय रुग्णालयाच्या आरोग्य शिबिराप्रसंगी उपस्थित प्रमुख मान्यवर.

## कोल्हापुरात संजीवनी धर्मादाय रुग्णालयाच्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन

बोरपाडळे,ता.८(प्रतिनिधी)–

..................................

**कोल्हापूर येथे संजीवनी धर्मादाय सह आयुक्त श्रीमती निवेदिता पवार , धर्मादाय उप आयुक्त श्रीमती कांचनगंगा सुपात्रे आणि वैद्यकीय अधिकारी महादेव जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत धर्मादाय रुग्णालयाच्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.**

यावेळी १५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.धर्मादाय आयुक्तांनी तसेच अन्य प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उपचार पद्धती जाणून घेतली व उपक्रमाचे कौतुक केले .प्रारंभी महादेव जावळे यांनी प्रास्ताविक केले.धर्मादाय सहआयुक्त निवेदिता पवार यांनी आरोग्यसेवा आणि उपचार पद्धती याबाबत आपले मत व्यक्त केले.चेतना अपंगमती विकास संस्था, कोल्हापूर तसेच संजीवनी धर्मादाय रुग्णालय आणि डॉ. दिपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर, बोरपाडळे यांच्या वतीने आणि धर्मादाय कोल्हापूरच्या सह आयुक्त नवेदिता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.या आरोग्य शिबिरात डॉ केदार तोडकर आणि डॉ पराग कुलकर्णी यांनी उपक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

तरुण भारत बुधवार ९ एप्रिल २०२५

## संजीवनीची सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद : निवेदिता पवार

वार्ताहर
नावली

डॉ. दीपक पाटील आरोग्य व शिक्षण समूहाने आरोग्याची सेवाची सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे, असे धर्मादाय आयुक्त निवेदिता पवार यांनी डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व संशोधन केंद्र बोरपाडळे यांच्या वतीने जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने संजीवनी धर्मादाय रुग्णालय आपल्या दारी या उपक्रमांतर्गत चेतना मतिमंद मुलांची शाळा येथे मुलांची आरोग्य तपासणी शिबिर बोलताना केले. धर्मादाय उपायुक्त कांचनगंगा सुपात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.



नावली : संजीवनी धर्मादाय उपक्रमांतर्गत शिबिर उद्घाटनप्रसंगी निवेदिता पवार, मान्यवर.

त्या म्हणाल्या, सामान्य माणसाबरोबरच देशाचे भवितव्य असणारे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी व त्यांच्यावर मोफत उपचार हे कार्य इतर संस्थांनी आदर्शवत घेण्यासारखे आहे. त्यांचे अनुकरण इतर संस्थांनी केले तर आरोग्यावर होणारा सामान्य माणसाचा खर्च थांबेल. यावेळी वैद्य कोरडे मॅडम यांनी नागरिकांना आरोग्यसेवा, आरोग्य तपासणी आणि औषध उपचार याबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. आरोग्य शिबिरात डॉ. केदार तोडकर, डॉ. पराग कुलकर्णी यांच्या सहकार्याने १५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. आवश्यक औषधोपचार करण्यात आले. विद्यार्थ्यांना स्वखर्चाने औषधे पुरवण्याच्या उपक्रमाचे कौतुक करत, धर्मादाय सह आयुक्त कोरडे व त्यांच्या शासकीय टीमने संजीवनी धर्मादाय हॉस्पिटलच्या मेडिकल टीम व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्थेचे संस्थापक डॉ. दीपक पाटील, डॉ. स्वाती पाटील यांची व राबवत असलेल्या उपक्रमाची प्रशंसा केली.